**ठळक बातम्या**

- भारताला जगातल्या तीन प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्यासाठी प्रथम आणि द्वितीय श्रेणीतल्या शहरांचा आर्थिक विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन

- मध्यम आकाराच्या लढाऊ विमान निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीला संरक्षण मंत्र्यांची मान्यता

- प्राप्तिकर विवरण भरण्यासाठी १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

- राष्ट्रपतींच्या हस्ते पद्म पुरस्कारांचं वितरण, अशोक सराफ, अश्विनी भिडे, अच्युत पालव यांना पुरस्कार प्रदान

**आणि**

- महाराष्ट्रात पावसाचा जोर कायम / जून ते सप्टेंबर या काळात देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज

**<><><><><>**

भारताला जगातल्या तीन प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक बनवण्यासाठी प्रथम श्रेणी आणि द्वितीय श्रेणीतल्या शहरांचा आर्थिक विकास अत्यंत महत्त्वाचा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधे गांधीनगर इथे आयोजित कार्यक्रमात बोलत होते. जगातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थेच्या क्रमवारीत आपण ११व्या क्रमांकावरून चौथ्या क्रमांकावर झेप घेतली आहे, असंही मोदी यावेळी म्हणाले.

**होल्ड बाईट - नरेंद्र मोदी**

प्रधानमंत्री गुजरातच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी आज गांधीनगरमध्ये ऑपरेशन सिंदूर सन्मान यात्रेला हिरवा झेंडा दाखवला. यावेळी त्यांच्यासोबत गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येनं उपस्थित असलेल्या स्थानिकांनी ऑपरेशन सिंदूरसाठीचे फलक आणि तिरंगा हातात घेऊन घोषणा दिल्या.

**<><><><>**

दहशतवादाविरोधात भारताच्या शून्य सहिष्णूतेच्या धोरणाचा संदेश जागतिक स्तरावर पोहोचवण्यासाठी सर्वपक्षीय प्रतिनिधीमंडळं विविध देशांना भेटी देत आहेत.

काँग्रेसचे खासदार शशी थरुर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज गयाना या दक्षिण अमेरिकेतल्या देशाला भेट देऊन भारताची बाजू स्पष्ट केली. जदयुचे खासदार संजय कुमार झा यांच्या नेतृत्वाखालच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाने सिंगापूरच्या संरक्षण मंत्री तसंच परराष्ट्र मंत्री यांची भेट घेतली.

द्रमुक खासदार कन्नीमोळी यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने स्लोवेनियन राष्ट्राध्यक्षांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन सिंदूर नंतरच्या न्यू नॉर्मल बद्द्ल  माहिती दिली.

शिवसे◌ेना खासदार श्रीकांत शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार  सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळांनी काल दक्षिण कोरिया, कुवेत, कतार, काँगो आणि स्लोव्हेनिया आदी विविध देशांच्या भेटी घेऊन दहशतवादाविरोधातली भारताची भूमिका स्पष्ट केली.

**<><><><>**

मध्यम आकाराच्या लढाऊ विमान निर्मिती प्रकल्पाच्या अंमलबजावणीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मान्यता दिली आहे. नव्या स्वरूपात हा कार्यक्रम राबवताना सार्वजनिक आणि खासगी क्षेत्रांना समान संधी मिळेल असं संरक्षण मंत्रालयाच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे. या लढाऊ विमानांचं उत्पादन देशात अधिक क्षमतेनं होऊ लागलं की संरक्षण क्षेत्रातल्या आत्मनिर्भरतेच्या वाटेवर महत्त्वाचा टप्पा पार होईल.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मुंबईत माधवबाग मंदिराच्या दीडशेव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भाग घेतला. या संस्थेत वेद, उपनिषद आणि गीतेचा अभ्यास करण्याचे कार्य करण्याबरोबरच आरोग्य सेवा पुरवण्याचे कार्य व्हावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

**<><><><>**

भारत ऊर्जेच्या बाबतीत स्वावलंबी होण्याकडे सतत वाटचाल करत आहे असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप पुरी यांनी समाजमाध्यमवरच्या संदेशात

म्हटलं आहे. देशाने ग्रीन हायड्रोजन विकासात लक्षणीय प्रगती केली असून १९ कंपन्यांना वार्षिक ८, लाख ६२ हजार टन उत्पादन क्षमता वाटप करण्यात आली आहे. तसंच १५ कंपन्यांना वार्षिक ३,००० मेगावॅट वार्षिक इलेक्ट्रोलायझर उत्पादन क्षमता देण्यात आली आहे, असं हरदीप पुरी म्हणाले. "आपण सध्या दरवर्षी १५० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त किमतीचे कच्चे तेल आयात करत आहोत, असंही हरदीप सिंह पुरी यांनी सांगितलं.

<><><><><>

निर्यात केंद्रित संच आणि विशेष आर्थिक क्षेत्रांमधल्या संचांमधून झालेल्या निर्यातीवर शुल्क माफी आणि कर योजने अंतर्गत दिले जाणारे लाभ पुन्हा सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. १ जून पासून याची अंमलबजावणी केली जाईल. याआधी हे लाभ ५ फेब्रुवारी २०२५ पर्यंत दिले जात होते. जागतिक बाजारात भारताची निर्यात क्षमता वाढावी हा या योजनेचा हेतू आहे.

<><><><><>

देशाचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथीनिमित्त आज त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज एक्स समाजमाध्यमावर पंडित नेहरु याचं स्मरण केलं आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, तसंच काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि इतर मान्यवरांनी दिल्लीत शांतिवन या पंडित नेहरूंच्या स्मृतिस्थळी जाऊन आदरांजली वाहिली.

<><><><><>

प्राप्तिकर विवरण भरण्यासाठीची मुदत केंद्रीय प्रत्यक्ष करमंडळाने १५ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे. विवरण पत्र भरण्यासाठीची अधिसूचना जाहीर करण्यात विलंब झाल्यामुळे ही मुदतवाढ देण्यात आली आहे. दरवर्षी ३१ जुलै पर्यंत करदात्यांना परताव्यासाठी विवरणपत्र भरता येतात. मात्र, यंदा १५ सप्टेंबरपर्यंत मुदत वाढवल्याची तपशीलवार अधिसूचना नंतर जाहीर होईल, असं सीबीडीटीच्या एक्स समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवन इथं पद्म सन्मान प्रदान करण्यात आले. या सोहळ्यात निवृत्त न्यायमूर्ती जगदीश सिंह खेहर यांना आणि कुमुदिनी लाखिया, डॉक्टर शारदा सिन्हा यांना मरणोत्तर पद्मविभूषण सन्मान प्रदान

करण्यात आला. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत मनोहर जोशी यांना लोककार्यासाठी मरणोत्तर पद्मभूषण सन्मान प्रदान करण्यात आला. तर डॉ. विलास डांगरे, शास्त्रीय गायिका अश्विनी भिडे, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, सुलेखनकार अच्युत पालव यांना पद्मश्री सन्मानानं गौरवण्यात आलं.

या वर्षी सरकारनं १३९ पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून त्यामध्ये ७ पद्म विभूषण, १९ पद्म भूषण आणि ११३ पद्मश्रीं पुरस्कारांचा समावेश आहे. पहिल्या समारंभात राष्ट्रपतींनी ७१ पद्म सन्मान प्रदान केले. आजच्या कार्यक्रमात ६८ मान्यवरांना पद्म सन्मान प्रदान करण्यात आले.

**<><><><><>**

महाराष्ट्राच्या बहुतांश भागांत पावसाचा जोर कायम असून बऱ्याच ठिकाणी जनजीवन विस्कळीत झालं आहे. गेल्या चोवीस तासात कोकण, विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. पुढचे दोन दिवस कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

राजधानी मुंबईत आज सकाळपासून ढगाळ वातावरण असून अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी येत आहेत.

**जालना** शहरासह जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी आज वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. घनसावंगी आणि अंबड तालुक्यात नदी नाल्यांना पूर आला आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी झाडांवर वीज कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत.

**बीड** जिल्ह्यातल्या सहा मंडळात अतिवृष्टी झाली आहे. बहुतांश नदी, नाल्यांना पुर आला असून बीड शहरातून वाहणारी बिंदुसरा नदी खळखळून वाहू लागली आहे.

**लातूर** शहर आणि जिल्ह्याच्या बहुतांश भागात आज पुन्हा एकदा मुसळधार पाऊस झाला. लातूर शहरातील अनेक रहिवासी वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचलं होतं.

**रत्नागिरी** जिल्ह्यात गेल्या आठवड्यापासून जोरदार पाऊस आहे आणि मे महिन्यात पावसामुळे एकंदर ३२ लाख रुपयांचं नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे.

राज्यात नुकत्याच झालेल्या पावसात ज्या शेतकऱ्यांचं नुकसान झालं आहे, त्यांना राष्ट्रीय आपत्ती निवारण प्राधिकरणाच्या निकषानुसार नुकसानभरपाई देण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळानं मंजुरी दिल्याची माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिली.

<><><><><>

भारतीय हवामान खात्याने यावर्षीच्या मान्सूनचा वार्षिक अंदाज वर्तवणारा अहवाल आज जाहीर केला. यावर्षीच्या मान्सूनमध्ये जून ते सप्टेंबर या काळात देशातल्या विविध भागात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडेल असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. मध्य आणि दक्षिण भारतीय द्विपकल्पातील मान्सूनच्या वाढत्या प्रमाणामुळे भारताच्या कृषी उत्पादनात वाढ होण्याचीही शक्यता आहे. वायव्य आणि ईशान्य भारतात मात्र पावसाचं वार्षिक प्रमाण सरासरीपेक्षा थोडं कमी असेल असं हवामान विभागानं या अहवालात म्हटलं आहे.

<><><><><>

केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रताप जाधव यांच्या उपस्थितीत पुदुच्चेरी इथं आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या उलटगणतीच्या २५ दिवसीय कार्यक्रमाचं आज उद्घाटन करण्यात आलं. २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या मुख्य सोहळ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी विशाखापट्टणम इथल्या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. तत्पूर्वी देशभरात विविध ठिकाणी योग दिनाच्या काउंटडाऊन कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत आहे.

<><><><><>

आय पी एल मध्ये आज लखनौ सुपर जायन्ट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू यांच्यामधे सामना सुरू आहे.

रॉयल चॅलेंजर्स बेंगळुरू नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा लखनौ सुपर जायन्ट्सचा एक गडी बाद ५६ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**